I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** मंगळवेढा **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0048 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/01/2025 04:43 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** शनिवार **Date from (दिनांक पासून):** 25/01/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 25/01/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 10:50 तास **Time To (वेळेपर्यंत):** 12:27 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 26/01/2025 **Time (वेळ):** 04:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 26/01/2025 03:55 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 10 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** सिध्देश्वर मंदिर परीसर , मातणुर ता मंगळवेढा ,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्‌दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6.** **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a)** **Name (नाव):** रविंद्र राम काळे

**(b)** **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c)** **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1964

**(d)** **Nationality (राष्ट्रीयत्व):**भारत

**(e)** **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f)** **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g)** **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h)** **Occupation (व्यवसाय):**

**(i)** **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बोराळे, तामंगळवेढा, मंगळवेढा, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | बोराळे, तामंगळवेढा, मंगळवेढा, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

**(j)** **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9371260227

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | पो.ह 905 महेश राचप्पा कोळी | | | 1. Town/Village (शहर / गाव): निंबर्गी कंदलगाव रोडला,Tehsil (तहसील): तादक्षिण सोलापूर,Police Station (पोलीस ठाणे): मंगळवेढा,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | पो.शि.624 वैभव रामचंद घायाळ | | | 1. Town/Village (शहर / गाव): गोपाळपूर ता पंढरपूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): मंगळवेढा,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,00,000/ रु रक्कम | 5,00,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 5,00,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

वर्दी जबाब दि. 26.01.2025

मी रविंद्र राम काळे, वय 61 वर्ष, व्यवसाय:- शेती रा. मु.पो. बोराळे, ता.मंगळवेढा, जि. सोलापूर, महाराष्ट्र, पिन कोड 4133305 मो.नं. 9371260227

मी वरील ठिकाणी माझे कुटंुबियासमवेत राहणेस आहे. माझे गावामधील शेतीमधून तसेच जनावरांचे येणारे दुध व्यवसायामधील उत्पन्ना मधून आमचा उदरनिर्वाह चालत असतो.

दि. 23.01.2025 रोजी माझे परिचयाचे मंगळवेढा पोलीस ठाणे येथील महेश कोळी, पोलीस यांनी दुपारी 04.00 वा चे सुमारास मला त्यांचे मोबाईलवरून फोन करून भेटण्यास बोलविले असता मी बोराळे व राहटेवाडी गावाचे दरम्यान असलेल्या काळया रानामध्ये जावून महेश कोळी यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांचेसोबत धापटे साहेब व घायाळ पोलीस हे देखील हजर होते. त्यावेळी महेश कोळी यांनी सांगोला येथील शिंदे सोनार यांनी रणजित पवार व इतर साथीदार यांचेविरूध्द स्वस्तात सोने देतो म्हणून त्यांचेकडून 10 लाख रूपये जबरदस्तीने घेवून गेले असल्याबाबत पोलीस ठाणेत तक्रार दिले असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी सोनार यास रणजित पवार यांनी माझे बोराळे गावातील शिवारात माझेसमक्ष सोने दाखविले असल्याचे सांगून सदर घटनेमध्ये माझा भाचा अमित शरण्याप्पा भोसले व सुरज शरण्याप्पा भोसले हे रणजित पवार याचे सोबत सोनार यांचेकडून पैसे हिसकावून घेताना हजर असल्याचे सांगून नमूद तक्रारी मधून माझे नाव कमी करण्यासाठी व माझा भाचा अमित भोसले यास अटकपुर्व जामीन करून देण्यासाठी माझ्याकडे 10 लाख रूपयांची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझ्याकडे एवढे पैसे नसल्याचे सांगून मी तुमच्या साहेबांना भेटतो असे सांगितले असता त्यांनी मला मेन पी.आय. साहेबांना भेटण्यास येण्यास सांगितले होते. त्यानंतर मी त्याचदिवशी रात्री 08.30 वा चे सुमारास मंगळवेढा येथील एमआयडीसी परिसरामध्ये मेन पी.आय.साहेब यांना जावून भेटलो. त्यावेळी त्यांचेसोबत धापटे साहेब, महेश कोळी व वैभव घायळ हे देखील होते. त्यावेळी मेन साहेबांनी मला सांगोला येथील सोनार यांनी माझे नाव घेतले असून माझे नाव कमी केले असून मी तुम्हाला मदत करतो, तुम्ही आम्हाला मदत करा असे बोलून महेश कोळी जसे सांगतात तसे कर असे सांगितले. त्यावेळी मी पी.आय.साहेबांना मी सोनार व रणजित पवार यांचे चर्चेमध्ये हजर नसल्याचे सांगून माझे भाचे देखील सदर घटनेमध्ये सहभागी नसल्याचे सांगून सदर घटनेमध्ये माझा काहीएक संबंध नसल्याचे सांगितले होते. त्यावेळी महेश कोळी यांनी मला माझे नाव तक्रारीतून कमी करण्यासाठी व माझा भाचा अमित भोसले यास अटकपुर्व जामीन करून देण्यासाठी पुन्हा माझ्याकडे 10 लाख रूपयांची मागणी केली. त्यावेळी तेथे हजर असलेले घायाळ पोलीस यांनी तेवढे पैसे द्या, नाहीतर तुमच्या भाच्यांना अटक करू अशी भिती घातली होती. तसेच काल रात्रीपासून मंगळवेढा पोलीस ठाणे येथील पोलीस महेश कोळी यांनी मला वारंवार फोन करून तात्काळ भेटण्यास बोलवित आहे.

पी.आय. साहेब, धापटे साहेब, पोलीस महेश कोळी व घायळ यांना मी 10 लाख रूपये दिले नाहीत तर ते माझेविरूध्द तसेच माझा भाचा अमित व सुरज यांचेविरूध्द मंगळवेढा पोलीस ठाणे येथे

दाखल तक्रारी अर्जावरून खोटा गुन्हा दाखल करणेची मला भिती आहे.

मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. 24.01.2025 रोजी मी, माझा मुलगा अनुप, भाचा संजय असे पुणे ॲन्टी करप्शन ब्युरो, येथील सरदेशपांडे साहेबांना भेटून माझी मंगळेवढा पोलीस ठाणे येथील अधिकारी व कर्मचारी  यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळविली होती. त्यावेळी तेथील साहेबांनी सांगली ॲन्टी करप्शन येथील पाटील साहेब यांना संपर्क करून त्यांना माझे तक्रारीची पुढील कारवाई ही त्यांना करण्यास सांगून मला पाटील साहेब यांचा मोबाईल नंबर दिलेला होता. त्यानंतर मी लागलीच सांगली ॲन्टी करप्शन येथील पाटील साहेब यांना संपर्क करून त्यांना माझी मंगळवेढा पोलीस ठाणे येथील अधिकारी व कर्मचारी यांचेविरूध्दची तक्रार कळविली होती. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला दि.25.01.2025 रोजी सकाळी 10.00 वा. पथकासह मंगळवेढा येथे येत असल्याचे सांगून आलेनंतर संपर्क करीत असल्याचे सांगितले.

दि.25.01.2025 रोजी पाटील साहेब यांनी मला संपर्क करून मला सांगोला ते सोलापूर जाणारे रोडलगत असले बनपूरी गावा जवळील बंद स्थितीत असले भारत पेट्रोलपंप येथे हजर राहण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझेकडील बोलेरो वाहन क्र. एमएच 13 सीके 2509 मधून 10.00 वा चे सुमारास मी व माझा मुलगा अनुप असे जावून पाटील साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला त्यांची व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला पोलीस निरीक्षक खाडे साहेब हे माझे तक्रारीबाबत पुढील कारवाई करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक खाडे साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीची माहिती देवून मला माझा तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझा तक्रारी अर्ज माझा मुलगा अनुप यांचेकरवी हजर केला. मी दिले तक्रारी अर्जावर खाडे साहेब यांनी वाचून सही केली. त्यानंतर खाडे साहेब यांनी त्यांचेसोबत असले शासकीय पंचांची ओळख करून दिली.

सदर कारवाईसाठी पंच नं. 1 म्हणून महेश कोळी यांनी व पंच नं.2 म्हणून सुहास काळे यांनी काम करण्याचे निश्चित केले. त्यानंतर खाडे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचा समक्ष थोडक्यात कथन केली व माझा तक्रारी अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पंचांनी तक्रारी अर्ज वाचून सांगितलेली तक्रार व तक्रारी अर्जातील मजकूर एकच असल्याचे खात्री झालेनंतर तक्रारी अर्जावर सहया केल्या.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला तुमचेकडे कोण पोलीस लाच मागणी करत आहेत व पाठपुरावा करत आहे असे विचारले असता मी त्यांना महेश कोळी पोलीस हे मला लाच मागणी संदर्भात वारंवार कॉल करत आहेत असे सांगितले. त्यानंतर खाडे साहेब यांनी महेश कोळी, पोलीस यांचा ठाव-ठिकाणा निश्चित करण्यासाठी माझे मोबाईलवरून पोलीस महेश कोळी यांचे मोबाईल वर कॉल करून पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यानंतर खाडे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल वरून महेश कोळी, पोलीस यांचे मोबाईल नंबर 8208237321 वर 10.21 वा चे सुमारास पंचांसमक्ष कॉल केला असता त्यांनी माझा कॉल स्विकारला नाही. त्यानंतर लगेचच महेश कोळी, पोलीस यांचा माझे मोबाईलवर फोन येत असलेबाबत मी खाडे साहेब यांना सांगितले. त्यावेळी खाडे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी कोळी पोलीस यांचा 10.22 वा. चे सुमारास फोन उचलून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी मी कोळी पोलीस यांना माचणूर येथील

मंदीर येथे येणेची विनंती केली असता कोळी पोलीस यांनी माचणूर येथे येत असल्याचे सांगितले. आमचे मधील संभाषण खाडे साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केले आहे.

त्यानंतर खाडे साहेब यांनी माचणुर गावाजवळ जाणेचे निश्चित करून खाडे साहेब व सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनाने व मी आमचेकडील बुलेरो वाहनाने बनपूरी गावाजळील भारत पेट्रोलपंप येथून रवाना होवून सांगोला ते सोलापूर जाणारे रोडलगत असले वडदेगाव फाटा येथील हॉटेल स्वराज्य येथे सुरक्षित ठिकाणी दाखल झालो. त्यानंतर खाडे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी त्यांचेकडील वाहनामध्ये बसलो.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला व पंचांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 10.50 वा सुरु करुन माझे शर्टच्या आतील बंडीस असले खिश्यामध्ये ठेवला. त्यानंतर मी, पंच नं.1. महेश कोळी व माझा मुलगा अनुप असे आमचे बुलेरो वाहन क्र. एमएच 13 सीके 2509 मधून रवाना होवून माचणूर येथील सिध्देश्वर मंदीर येथे परिसरात दाखल झालो. त्यावेळी कोळी पोलीस यांना माझे मोबाईवरून संपर्क करून त्यांना आम्ही माचणूर येथील सिध्देश्वर मंदीर येथे आलो असल्याचे सांगितले. त्यानंतर काही वेळाने महेश कोळी यांना मला फोन करून नदीकडे जाणारे रोडवर असले कमानी जवळ येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी, पंच नं.1 कोळी व माझा मुलगा अनुप असे आमचेकडील बुलेरो वाहनामधून सिध्देश्वर मंदीर येथून नदीकडील जाणारे रोडवरील कमानीजवळ दाखल झालो. त्यावेळी  महेश कोळी व घायळ पोलीस हे त्यांचेकडील काळया रंगाचे कार मधून तेथे आलेले होते. त्यानंतर महेश कोळी व घायाळ पोलीस असे आमचे बुलेरो वाहनामध्ये येवून बसले. त्यावेळी कोळी पोलीस यांनी पंच नं.1 कोळी यांचेकडे हात करून त्यांना वाहनामधून खाली थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच नं.1 कोळी हे वाहनातून उतरले.  त्यानंतर मी, माझा मुलगा अनुप व महेश कोळी व घायाळ पोलीस असे आमचे वाहनामधून तेथून थोडया अंतरावर माचणुर जाणारे रोडवर थांबलो. त्यावेळी महेश कोळी पोलीस यांनी मला "ते उरका पटदिशी, काल बोललेल करून टाका पटदिशी, आम्हाला त्याला अटक करायला मोकळ होतय, रिकव्हरी करा पटदिशी" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "तुम्ही आकडा किती लई सांगालाय मला" असे म्हणालो. त्यावर महेश कोळी यांनी "सांगितलय, जे दहा हाय ते तर तुम्हाला द्यायलाच लागेल" असे म्हणून माझेकडे दहा लाख रूपयांची मागणी केली. त्यावर मी त्यांना "दहा लाख रूपये" जास्त होत असल्याचे सांगून रक्कम कमी करणेची विनंती केली. त्यावर घायाळ पोलीस यांनी "काय ते आरोपी चेंज करतो, दुसर देतो असे सांगितल त्यांनी, त्यासाठी सायबांनी आकडा जरा जास्त सांगितलाय.....हयातच जर कमी कराल तर औघड हाय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "कोणच्या सायबांनी सांगितल" असे विचारले असता घायाळ पोलीस यांनी "आमच्या सायबांना....मेन साहेब...मध्ये आपल्या कोण हाय, मेन साहेब लक्षात ठेवा आपल" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना रक्कम कमी करणेची विनंती केली असता घायाळ पोलीस यांनी "मामा कमी होत न्हाय.... नऊ आरोपी तुमचे कमी केलेत, तुमच नाव कमी केलेय, एवढ सहकार्य सायबांनी केले" असे म्हणाले. त्यावर कोळी पोलीस यांनी "मामा तुमच मध्ये बसलो, तुमच्यासाठी एवढ बोलण खाललय.....तुमच्यासाठी तुम्हाला न सांगता तुमच नाव काढलय मामा" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "काय अस असतय काय" असे म्हणालो असता कोळी यांनी "साहेब माझ शब्द पडून देत नव्हत, एका शब्दावर तुमच काम केल काल, आता तुम्ही न आल्यामुळ साहेब एवढ बेकार

बोलल....तुमच्या शब्दाखातीर मी जावून परत सायबांना बोलल" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "शेत लिहून दिले असल्याचे सांगून आता पाच ची जुळण केली असल्याचे सांगून तुम्हाला सोमवारी तिन देणार असल्याचे सांगितले. त्यावर घायाळ पोलीस यांनी "न्हाय, न्हाय, न्हाय" असे म्हणाले व कोळी यांनी "तस न्हाय होत न्हाय...हे जे दहाच्या दहा आपल्याला पवार कडन दाखवायच आपल्याला" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना रक्कम कमी करणेची विनंती केली असता कोळी पोलीस यांनी "तुम्हाला एवढ सहकार्य केल ना मामा" असे म्हणाले. त्यावर घायाळ पोलीस यांनी "आता तुम्ही एक आरोपी हजर करतो म्हणला...आणि दहा लाख रिकव्हरी" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना सायबांना फोन लावून देण्याची विनंती केली असता घायाळ पोलीस यांनी "न्हाय न्हाय अस बोलत न्हायत....साहेब लई चिडलोय ओ, दोन दिवस झाले आमचे हाल झालेत" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना विनंती केली असता घायाळ पोलीस यांनी "तुमच नाव काढण्यासाठी सायबांनी एवढ मदत केलय बर का...फक्त तुमच्यासाठी आणि कोळी सायबांसाठी" असे म्हणून "तुम्हाला देखील सहकार्य केले असल्याचे सांगून माझ्या एका भाच्याला अटकपुर्व जामीन दिला असल्याचे सांगितले. त्यावर मी त्यांना पुन्हा रक्कम कमी करणेची विनंती केली असता कोळी पोलीस यांनी "होत न्हाय...मी सरळ सांगतो होत न्हाय" असे म्हणाले. त्यावर घायाळ पोलीस यांनी "तुम्हाला जास्त सांगितल काय, त्याच्यापेक्षा जी गुन्हयातील रिकव्हरी होत्या, त्याच्यापेक्षा एक रूपया जास्त सांगितल न्हाय" असे म्हणाले. त्यावर कोळी पोलीस यांनी "रिकव्हरी मध्ये कमी होत न्हाय ओ" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "तुम्हाला आता पाच देतो व राहिलेली तिन चार वाजेपर्यंत देतो" असे सांगितले.

त्यावर कोळी पोलीस यांनी मला रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना सोमवारी उर्वरित रक्कम देतो असे बोललो असता त्यांनी त्यास नकार देवून अध्र्या तासामध्ये सगळीच रक्कम घेवून येण्यास सांगितले. त्यावर मी त्यांना पाच लाख रूपये अध्र्या तासाने व उर्वरित रक्कम चार-पाच वाजेपर्यंत देत असल्याचे सांगितले. त्यावर कोळी पोलीस यांनी "तिन चार नाय, तुम्हाला सहाचे टाईमींग देतो, पण राहिलेली सहाला बरोबर पाहिजेत" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना तुम्ही इथेच थांबण्यास सांगून अध्र्या तासामध्ये पैसे घेवून येत असल्याचे सांगितले. त्यानंतर मी, माझा मुलगा अनुप यांचेसह पंच नं.1 कोळी यांना घेवून आमचेकडील बोलेरो वाहनामधून रवाना होवून खाडे साहेब व सापळा पथक थांबले ठिकाणी आलो. त्यावेळी खाडे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला. त्यानंतर खाडे साहेबांनी मला व पंच नं.1 कोळी यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुण झालेल्या संभाषणाची पंचांसमक्ष खात्री केली.

मी दिले लाच मागणी तक्रारी अर्जाचे अनुषंगाने खाडे साहेबांनी महेश कोळी पोलीस यांचेकडे केले पडताळणी कारवाईमध्ये, महेश कोळी व वैभव घायळ, पोलीस यांनी मंगळवेढा पोलीस ठाणेस दाखल असले अर्ज चौकशीवरून भविष्यात दाखल होणा-या गुन्हया मधून माझे आरोपी म्हणून असलेले नाव कमी करण्यासाठी आणि माझा भाचा अमित भोसले यास गुन्हयामध्ये अटकपुर्व जामीनसाठी मदत करण्यासाठी माझ्याकडे 10,00,000/- रूपयांची रिकव्हरीच्या नावाखाली लाचेची मागणी करून त्यापैकी पहिला हप्ता 5,00,000/- रूपये लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. तसेच मी महेश कोळी व वैभव घायाळ यांना पी.आय.साहेबांना फोन लावून त्यांचे सोबत बोलणे करून देणेची विंनती केली असता त्यांनी साहेबांना फोन लावणेस नकार दिला असून त्यांनी

लागलीच लाच रक्कम घेवून येण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर खाडे साहेब यांनी मला मेन पी.आय. साहेब यांची पडताळणी करावयास लागणार असल्याचे सांगितले असता मी त्यांना महेश कोळी व घायाळ पोलीस यांनी मला लागलीच पैसे घेवून येण्यास सांगितले असल्याने मी जर पी.आय. साहेब यांची भेट घेण्यास गेलो तर ते दोघे माझ्याकडून परत लाच रक्कम स्विकारणार नसल्याचे सांगितले.

त्यानंतर खाडे साहेबांनी महेश कोळी व वैभव घायाळ पोलीस यांचेविरूध्द लागलीच सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित करुन मला लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्यावेळी मी खाडे साहेबांना माझेकडे फक्त 1,00,000/- रूपये असल्याचे सांगून सदरची रक्कम दोन्ही पंचांसमक्ष खाडे साहेब यांचे समक्ष हजर केली. त्यानंतर खाडे साहेब यांनी महेश कोळी व वैभव घायाळ पोलीस यांनी लाच मागणी केलेली 5,00,000/- रूपये पैकी मी हजर केलेले 500/- रूपये दराच्या चलनी नोटा असे एकुण 1,00,000/- रूपये व त्यांचेकडील 500/- रूपये दराचे असे एकुण 4,00,000/- रूपये डमी नोटा असे एकुण 5,00,000/- रूपये वापरण्याचे निश्चित केले.

त्यानंतर खाडे साहेब यांनी 5,00,000/- रूपये लाच रक्कमेचे नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर दोन्ही पंच, श्री. खाडे साहेब यांनी सही केली. त्यानंतर श्री. खाडे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा एका वर्तमान पेपरमध्ये गुंडाळून माझे हातामध्ये दिल्या. व खाडे साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर महेश कोळी पोलीस यांचा माझे मोबाईलवर फोन येत असल्याचे मी खाडे साहेब यांना सांगितले. त्यावेळी खाडे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी महेश कोळी यांचा फोन स्विकारून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी महेश कोळी यांनी मला ते माचणूर येथील मंदीर येथे थांबले असल्याचे सांगून सदर ठिकाणी लवकर येण्यास सांगून फोन कट केला. सदरचे संभाषण खाडे साहेब यांनी रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड केले आहे.

त्यानंतर खाडे साहेबांनी महेश कोळी व वैभव घायाळ पोलीस यांचेविरूध्द माचणुर येथील सिध्देश्वर मंदीर येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर खाडे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.19 वाजता सुरु करुन माझे शर्टच्या आतील बंडीस असले खिश्यामध्ये ठेवून आम्हास रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी, पंच नं.1 कोळी व मुलगा अनुप असे माझेकडील बुलेरो वाहनामधून रवाना झालो. त्यावेळी कोळी पोलीस यांचा मला फोन आल्याने मी त्यांचा कॉल स्विकारून त्यांना दोन मिनीटात पोहचत असल्याचे सांगितले. त्यानंतर मी वाहनामध्ये असताना महेश कोळी यांना फोन करून त्यांना सिध्देश्वर मंदीर येथे येण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही बुलेरो वाहनामधून माचणूर सिध्देश्वर मंदीर येथे दाखल झालो. आमचे पाठोपाठ खाडे साहेब व सापळा पथक असे त्यांचेकडील खाजगी वाहनांने सिध्देश्वर मंदीर परिसरामध्ये दाखल झालेत.

त्यानंतर काही वेळाने महेश कोळी व वैभव घायळ पोलीस हे त्यांचेकडील काळया रंगाचे कार मधून

आम्ही थांबलो ठिकाणी येवून त्यांची कार पार्क करून ते दोघे आमचे बुलेरो वाहनाजवळ आले. त्यावेळी मी त्यांना साहेब आल्यात का असे विचारले असता कोळी यांनी साहेब नायत असे म्हणाले. त्यावेळी मी कोळी व घायाळ यांना वाहनामध्ये बसण्याची विनंती केली असता ते दोघेही माझे बोलेरो वाहनामधील मध्यल्या सिटवर येवून बसले. त्यावेळी घायाळ पोलीस यांनी "ऐका हे करा... डिग्गी उघडली, डिग्गीत टाका ते" असे म्हणून लाच रक्कम त्यांचे कार मधील डिग्गीमध्ये ठेवण्यास सांगितली. त्यावर मी त्यांना "नाय नाय...सायबांना प्लीज एक फोन करून घ्या" असे म्हणालो असता घायाळ पोलीस यांनी "ऐका मामा, सायब वगैरे काय नाय, टाका ते आणि चला तुमाला बोलतो मी....टाका की डिग्गीत" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "काय त्याला, मी काय चोरून आणलय व्हाय" असे म्हणून मी बुलेरो वाहनाचे हॅण्ड ब्रोकजवळ वर्तमान पेपरमध्ये गुंडाळून ठेवलेली 5,00,000/- रूपये अॅथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेल्या लाच रक्कमेचा बंडल माझे उजवे हाताने महेश कोळी व वैभव घायाळ पोलीस यांचेसमोर धरून "काय म्हणजे मोजून घ्या" असे म्हणालो असता वैभव घायाळ यांने लाच रक्कमेचा बंडल त्यांचे उजवे हाताने माझेकडून स्विकारून त्यांचेजवळ ठेवून "किती हे" असे विचारले असता मी त्यांना "पाच" असे म्हणून मी हातरूमालाने तोंड पुसून हातरूमाल वाहनामधून बाहेर काढून लाच रक्कम स्विकारले बाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला.
लागलीच सापळा पथक माझेजवळ आले व खाडे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला बाजूला जावून थांबण्यास सांगितले. सापळा पथकाने महेश कोळी व वैभव घायाळ पोलीस यांना ताब्यात घेतले. तसेच वैभव घायाळ यांचे ताबेतील 5,00,000/- रुपये लाच रक्कम पंचा समक्ष पोलीसांनी ताब्यात घेतली.

सदर ठिकाणी खाडे साहेब यांनी महेश कोळी व वैभव घायाळ पोलीस यांना त्यांचे नाव, गाव विचारले असता महेश कोळी यांनी त्यांचे नाव श्री. महेश राचप्पा कोळी, वय-43 वर्षे, पो.ह/905 रा.निंबर्गी कंदलगाव रोडला, सिध्दारूढ मठाच्या मागील शेतामध्ये ता.दक्षिण सोलापूर जि.सोलापूर आणि वैभव घायाळ यांनी त्यांचे नाव श्री.वैभव रामचंद घायाळ, वय-32 वर्षे, पो.शि./624, रा. गोपाळपूर शिवाजीनगर, सुर्यवंशी किराणा दुकानाजवळ ता.पंढरपूर जि.सोलापूर असल्याचे सांगितले. सदर ठिकाणी सापळा कारवाई मधील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापूर्व, सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृह येथे पूर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 25.01.2025 रोजीचे 10.50 वा. ते 12.27 वा. च्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक 1) श्री. महेश राचप्पा कोळी, वय-43 वर्षे, पो.ह/905 व लोकसेवक 2) श्री.वैभव रामचंद घायाळ, वय-32 वर्षे, पो.शि./624, दोन्ही नेमणुक मंगळवेढा पोलीस ठाणे यांनी आपले स्वत: चे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने मंगळवेढा पोलीस ठाणेस दाखल असले अर्ज चौकशीवरून भविष्यात दाखल होणा-या गुन्हया मधून माझे आरोपी म्हणून असलेले नाव कमी करण्यासाठी आणि माझे इतर नातेवाईक यांना गुन्हयामध्ये अटकपुर्व जामीनसाठी मदत करण्यासाठी स्वत:करीता व साहेबांचे नावाने माझ्याकडे 10,00,000/- रूपयांची रिकव्हरीच्या नावाखाली लाचेची मागणी करून त्यापैकी पहिला हप्ता 5,00,000/- रूपये लाच रक्कम लागलीच घेवून येण्यास सांगून, दि. 25.01.2025 रोजीचे 13.19 वा ते 13.30 वा चे सापळा कारवाई वेळी यातील लोकसेवक 1) श्री. महेश राचप्पा कोळी, वय-43 वर्षे, पो.ह/905 व लोकसेवक 2) श्री.वैभव रामचंद घायाळ, वय-32 वर्षे,

पो.शि./624, दोन्ही नेमणुक मंगळवेढा पोलीस ठाणे यांनी माझेकडे लाचेची मागणी करून लोकसेवक 2) श्री.वैभव रामचंद घायाळ, वय-32 वर्षे, पो.शि./624 यांनी माझ्याकडून लाच रक्कम 5,00,000/- रूपये पंचांसमक्ष माचणूर सिध्देश्वर मंदीर परिसरामध्ये माझे बोलेरो वाहनामध्ये स्विकारली आहे. म्हणून माझी लोकसेवक 1) श्री. महेश राचप्पा कोळी, वय-43 वर्षे, पो.ह/905 रा.निंबर्गी कंदलगाव रोडला, सिध्दारूढ मठाच्या मागील शेतामध्ये ता.दक्षिण सोलापूर जि.सोलापूर व लोकसेवक 2) श्री.वैभव रामचंद घायाळ, वय-32 वर्षे, पो.शि./624, रा. गोपाळपूर शिवाजीनगर, सुर्यवंशी किराणा दुकानाजवळ ता.पंढरपूर जि.सोलापूर, दोन्ही नेमणुक मंगळवेढा पोलीस ठाणे, जि.सोलापूर यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मला माझा मुलगा अनुप यांनी वाचून दाखविला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला

वर्दीजबाब,

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Mahesh Krishnarao Dhawan (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Mahesh Krishnarao Dhawan

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** ADRPD8395F

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्‍ या/पाहिलेल्‍ या) शारीरिक वैशिष्‍ टये, व्‍ यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्‍ या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1982 | | - | | **चेचक:** क्र. |
| 2 | पुरुष | 1993 | | - | | **चेचक:** क्र. |

| Deformities / Peculiarities (व्‍ यंग वैशिष्‍ टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्‍ या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्‍ याच्‍ या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्‍ यापेक्षा अधिक तपशील दिल्‍ यास फक्‍ त यातील रकान्‍ यांची नोंद घेतली जाईल)**